Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 06/02/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**



# भारतीय चित्रकार बी. के. एस. वर्मा

बुक्कसागर कृष्णय्या श्रीनिवास वर्मा ऊर्फ बी. के. एस. वर्मा हे बंगळुरू येथील एक भारतीय चित्रकार होते. त्यांचा जन्म ५ सप्टेंबर १९४८ मध्ये कर्नाटकातील कर्नूर येथे झाला. त्यांची आई जयलक्ष्मी स्वत: एक कलाकार होत्या, तर त्यांचे वडील श्री. कृष्णमाचार्य संगीतकार होते. वर्मा यांना कलामंदिर, बंगळुरू येथे गुरु श्री. ए.एन. सुब्बाराव आणि देवेनहल्ली येथील शिल्पकार ए.सी.एच. आचार्य यांच्याकडून चित्रकला आणि शिल्पकलेचे प्रशिक्षण मिळाले. त्यांनी संपूर्ण भारतभर दोनदा प्रवास करून डॉ. राधाकृष्ण (भारताचे माजी राष्ट्रपती), देवीप्रसाद रॉय चौधरी, जैमिनी रॉय, नंदल बोस, के.के. हेब्बर, एम.एफ. हुसेन, पणिकर, राष्ट्र कवी कुवेम्पू, शिवराम कारंथ आणि इतर अनेक लोकांची भेट घेतली. त्यांनी या क्षेत्रातील अधिक ज्ञान आणि अनुभव मिळविण्यासाठी अजिंठा, वेरूळ आणि अनेक कला संग्रहालये आणि गॅलरींना भेट दिली.

१९८८ साली रशिया उत्सवात भारतीय महोत्सवासाठी त्यांच्या दोन चित्रांची निवड झाली. त्यांनी १९९७ मध्ये कुवेतमधील राजदूत भवन येथे 'आर्ट फॉर्म्युला' या कार्यक्रमात त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन केले होते. त्यांना बहरीनचे राजा - बिन खलीफा यांच्या 'बहरीन पीस २०००' या कार्यक्रमामध्ये त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली होती. त्यांनी लंडनमधील 'नेहरू सेंटर' येथेही त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन केले. बी. के. एस. वर्मा यांना १९८६ साली 'राज्य ललितकला अकादमी पुरस्कार', २००१ साली राज्योत्सव पुरस्कार तर २००१ साली कर्नाटक सरकारने 'कर्नाटक राज्य पुरस्कार' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित केले. बी. के. एस. वर्मा यांचे ६ फेब्रुवारी २०२३ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Feb 06, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401